# प्रेसनोट

ला.प्र. विभाग, धुळे
दिनांक १६.०१.२०२६

**स्व. सुदाम पिंगळे मेमोरिअल ट्रस्ट, धुळे संचलित श्रीमती शांताबाई पिंगळे, माध्य. व उच्च माध्यमिक विद्यालय, साक्री रोड, धुळे येथील मुख्याध्यापिका श्रीमती भारती जोशी यांनी तक्रारदार यांच्याकडे २,३४०/— रुपये लाचेची मागणी करुन सदर लाचेची रक्कम स्वत: स्विकारल्याने गुन्हा**

| | |
|---|---|
| **लाचलुचपत प्रतिबंधक विभाग** | धुळे |
| **पो. ठाणे, गुन्हा नोंद क्रमांक** | धुळे शहर पो. स्टे. गुरनं. २०/२०२६, जि. धुळे |
| **कलम व गुन्हा दाखल दिनांक** | भ्र.प्र. कायदा कलम ७ प्रमाणे, दि. १६.०१.२०२६ |
| **आरोपीचे नांव, वय व कार्यालय** | श्रीमती भारती गिरीष जोशी, वय ५६ वर्षे, मुख्याध्यापिका, श्रीमती शांताबाई पिंगळे, माध्य. व उच्च माध्यमिक विद्यालय, साक्री रोड, धुळे, रा. धनाई पुनाई कॉलनी, पारस प्रोव्हिजन समोर, रेल्वे स्टेशन मागे, धुळे |
| **स्विकारलेली लाचेची रक्कम** | २,३४०/— रुपये |
| **थोडक्यात हकिगत** | तक्रारदार हे श्रीमती शांताबाई पिंगळे, माध्य. व उच्च माध्य. विद्यालय, धुळे येथे पुर्णवेळ ग्रंथपाल पदावर कार्यरत आहेत. त्यांचे सेवेस २४ वर्षे पुर्ण झाल्यानंतरचे कालबध्द पदोन्नतीच्या बिलाच्या फरकाचे बिल तसेच त्यांचे पुर्णवेळ ग्रंथपाल पदावर उन्नयन रुपांतर झाल्याच्या पगाराचा फरक त्यांना अदा करण्यात आला नसल्याने तक्रारदार यांनी मुख्याध्यापिका श्रीमती भारती जोशी यांची भेट घेतली असता त्यांनी सदरची बिले अदा करण्यासाठी तसेच त्यांचे नियमित पगाराचे बिल आकारण्यासाठी तक्रारदार यांच्याकडे २,५००/— रुपये लाचेची मागणी केल्याची तक्रारदार यांनी दि.१३.०१.२०२६ रोजी ला.प्र.विभाग, धुळे कार्यालयात समक्ष हजर राहुन तक्रार दिली होती.<br>सदर तक्रारीची दि.१३.०१.२०२६ रोजी पंचासमक्ष पडताळणी केली असता मुख्याध्यापिका श्रीमती भारती जोशी यांनी सदरची बिले व नियमित पगार आकारण्यासाठी तक्रारदार यांच्याकडे एकुण २,३४०/— रुपये लाचेची मागणी करुन सदर लाचेची रक्कम दि.१६.०१.२०२६ रोजी स्वत: स्विकारतांना त्यांना रंगेहात पकडण्यात येवुन त्यांचे विरुध्द धुळे शहर पो.स्टे. येथे भ्र. प्र. अधिनियमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. |
| **सापळा अधिकारी** | सचिन साळुंखे, पोलीस उप अधीक्षक, ला.प्र.विभाग, धुळे |
| **सापळा पथक** | यशवंत बोरसे, पोलीस निरीक्षक, पोहेकॉ. राजन कदम, मुकेश अहिरे, प्रविण मोरे, संतोष पावरा, पोकॉ. मकरंद पाटील, प्रविण पाटील, प्रशांत बागुल, सागर शिर्के, प्रितेश चौधरी, मपोकॉ. रेश्मा परदेशी, पोहेकॉ. सुधीर मोरे, पोकॉ. जगदीश बडगुजर |
| **तपास अधिकारी** | पद्मावती कलाल, पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि. धुळे |
| **मार्गदर्शन** | १) मा. श्री भारत तांगडे, पोलीस अधीक्षक<br>२) मा. श्री. माधव रेडडी, अपर पोलीस अधीक्षक<br>३) मा. श्री. सुनिल दोरगे, अपर पोलीस अधीक्षक,<br>लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक परिक्षेत्र, नाशिक |

**लाचलुचपत विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, शासकिय/निम शासकिय अधिकारी/ कर्मचारी अथवा खाजगी पंटर यांनी काम करुन देण्यास लाचेची मागणी केल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धुळे येथे संपर्क साधावा.**

**"लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धुळे आपले सेवेशी सदैव तत्पर"**

| | |
|---|---|
| **संपर्क पत्ता** | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धुळे |
| **संकेतस्थळ** | acbmaharashtra.gov.in |
| **ईमेल** | dyspacbdhule@gmail.com |
| **टोलफ्री क्रमांक** | १०६४ |
| **दुरध्वनी क्रमांक** | ०२५६२—२३४०२० |
| **व्हॉटस ॲप क्रमांक** | ७७९८१६१०६४ |